# प्रकरण - ६

## निष्कर्ष

## प्रकरण - ५ वे

### निष्कर्ष

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासातून निष्पन्न होणारे निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

१. कलावादी व जीवनवादी दृष्टिकोणातून साहित्याची निर्मिती होत असते. जीवनवादी दृष्टिकोणातून ( Art for life's sake ) ज्या साहित्याची निर्मिती होते, त्यामध्ये आत्मचरित्र हा जीवननिष्ठ असा वाङ्मयप्रकार आहे. जीवनानुभूतीतून जीवनशोध घेण्याचा प्रयत्न आत्मचरित्रकार करित असतो.

२. आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार लेखकाच्या जीवनाशी निगडित असल्याने आत्मचरित्रात आत्मनिष्ठ भूमिकेलाच प्राधान्य मिळालेले असते.

३. इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मचरित्र हा मुक्त व स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र या वाङ्मयप्रकारा प्रमाणे आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारचे तंत्र असू शकत नाही.

४. आत्माविष्कार, जीवनबोध, सिंहावलोकन, जीवनचरित्र, मतप्रचार इ. आत्मचरित्राच्या विविध प्रेरणा असल्यातरी वस्तुनिष्ठ भूमिकेवरून ( तटस्थतेने ) घेतलेला आत्मशोध हे आत्मचरित्राचे खास वैशिष्ट्य असते.

५. आत्मचरित्राचा चरित्र, कादंबरी, कथा या वाङ्मयप्रकाराशी काही बाबतीत संबंध असला तरी त्या वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मचरित्राचे स्वरुप हे वेगळे व स्वतंत्र असते. कारण या वाङ्मयप्रकारात सत्यदर्शनाला अधिक महत्व देण्यात येते.

६. जीवनाची जडण-घडण, जीवनानुभव , व्यक्तिविकास , अेका विशिष्ट कालखंडाचे चित्रण अि. गोष्टी साहित्यात आढळत असल्यातरी आत्मचरित्र ही अेका व्यक्तीची कहाणी असल्यामुळे आत्मचरित्रात व्यक्तिचित्रण हा महत्वाचा घटक मानावा लागतो. कारण आत्मचरित्र ही केवळ व्यक्तीची कथा नसून ती व्यक्तिमत्वाची कथा असते.

७. व्यक्तिचित्रण हा बहुतेक वाङ्मयप्रकारांचा अेक महत्वाचा घटक आहे. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, खंडकाव्य या वाङ्मयप्रकाराप्रमाणे आत्मचरित्रात व्यक्तिचित्रणाला महत्व प्राप्त झालेले असते.

८. आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रणात व्यक्तीच्या मनोरचनेला महत्व प्राप्त झालेले असते. अशी व्यक्तिरेखा ही विशिष्ट (Particular) असली तरी तिच्या मनोधर्मामुळे ती सर्वसामान्य, प्रातिनिधिक (Universal) बनत असते.

९. कादंबरी , नाटक व लघुकथा हे वाङ्मयप्रकार रचनात्मकदृष्ट्या भिन्न असल्याने त्यातील व्यक्तिचित्रणाचे स्वरूपही भिन्न असते.

१०. आत्मचरित्रात आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखकाच्याच व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब अुमटत असल्याने हे व्यक्तिदर्शन अेकांगी ठरण्याचा संभव असतो. तथापि लेखकाच्या तटस्थता, सत्यदर्शन, मनमोकळेपणा या गुणामुळे हे व्यक्तिचित्रण जिवंत , वास्तव व स्वाभाविक ठरत असते.

११. आत्मचरित्रातील जीवनचरित्र व व्यक्तिदर्शन यातून मानवी जीवनाचे व स्वभावाचे जे चित्र आढळते त्याचा मनोविश्लेषणाच्या दृष्टिकोणातून वेध घेणे, मानसशास्त्रदृष्ट्या मीमांसा करणे हे शक्य होते. अितर कोणत्याही ललित-कृतीपेक्षा आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार मानसशास्त्राचा अभ्यासविषय होअू शकतो.

११. आंग्लपूर्व कालात मराठीत आत्मचरित्रपर लेखन झाले असले तरी आत्मचरित्र म्हणून लेखन निर्मितीचा प्रयत्न झालेला दिसून येत नाही.

१२. आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचा विकास हा आंग्लकालातच ( १८१८ ते १९४० ) झाला. या कालखंडात अनेक पुरुषांची आत्मचरित्रे आढळत असली तरी ती संपूर्ण जीवनाचे चित्रण करण्यापेक्षा विशिष्ट कालखंडाचेच अधिक चित्रण करताना आढळतात.

१३. या कालखंडात फारच थोड्या स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहिली असून ज्यांनी ती लिहिली आहेत, त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनाचे चित्रण करण्यापेक्षा वैवाहिक जीवनाचे कौटुंबिक चित्रण अधिक केलेले आढळते.

१४. पतीची अिच्छा, पुत्राची प्रेरणा व हितचिंतकाचे प्रोत्साहन यामुळे लक्ष्मीबाअींनी आत्मचरित्राचे लेखन केले असले तरी त्यात त्यांची भूमिका ही जीवनशोध व व्यक्तिशोध घेण्याची राहिली आहे.

१५. लक्ष्मीबाअींनी या आत्मचरित्रातून आपल्या वैयक्तिक जीवनाचे चित्रण केले असले तरी १८७२ ते १९२६ या कालखंडातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे समाजदर्शनही त्यातून घडते.

१६. ` स्मृतिचित्रे ` ही अेका स्त्रीची, अेका कुटुंबाची व अेका सामाजिक जीवनाची कथा आहे, असे आपणास आढळून येते.

१७. स्मृतिचित्रात जीवनकथा व व्यक्तिचित्रण या दोन वैशिष्ट्यांबरोबर प्रसंगनिर्मिती, विनोद, तटस्थता, सत्यदर्शन, भावनात्मकता, निरागसता व अकृत्रिम लेखनपद्धती अि. वैशिष्ट्ये आढळतात की ज्यामुळे या आत्मचरित्राचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्य महत्वाचे ठरते.

१८. लक्ष्मीबाअी स्वत:विषयी कमालीच्या अलिप्तपणे व तटस्थतेने लिहितात. आत्मगौरव, आत्मसमर्थन, आत्मप्रौढी या दोषापासून त्यांचे हे व्यक्तिचित्रण

SAKR. ... KAR LIBRARY ... HAPUR

अलिप्त आहे, हे ` स्मृतिचित्रे ` चे अेक अुल्लेखनीय वैशिष्ट्य मानावे लागेल. स्वतःच्या गुणदोषांची ही जाणीव त्यांच्या आत्मचरित्राचा वाङ्मयीन दर्जा अुंचावते.

१९. आपल्याबरोबर त्यांनी आपल्या पतीचे - रेव्ह. टिळकांचे - व्यक्तिचित्रण केले ते सुध्दा अुल्लेखनीय आहे. स्वभावभिन्नता असली तरी त्या कुठेही कटुतेने अुल्लेख न करता कमालीच्या संयमाने आपल्या पतीच्या गुणदोषांचे मार्मिक चित्रण करतात, हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्या कालखंडामध्ये ` पती हाच परमेश्वर ` अशी धारणा होती त्या कालखंडात त्या पतीचे दोष, चुका दाखवितात, आणि तरीही पतीवर अेकनिष्ठ प्रेम करीत राहतात, यात त्यांच्या पतीभक्ती बरोबरच स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचीही साक्ष पटते.

२०. समाजजीवनात सुष्ट व दुष्ट शक्ती नेहमीच असते. अशा प्रवृत्तीच्या अनेक व्यक्तींचे त्यांनी मार्मिकतेने केलेले चित्रण कमालीचे हृद्य आहे. त्यातून व्यक्तिस्वभावाची वैशिष्ट्ये कळतात, त्याचप्रमाणे लक्ष्मीबाअी टिळकांच्या व्यावहारिकपणाचे, चातुर्याचे, सावधानतेचे, सूक्ष्म निरीक्षणाचे दर्शनही घडते.

२१. व्यक्तिचित्रण करताना लक्ष्मीबाअी व्यक्तींच्या बहिरंगाचे चित्रण करण्यापेक्षा त्यांच्या कृतीतून व अुक्तीतून त्यांची स्वभाववैशिष्ट्ये दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्या आधारे त्या मनोदर्शन घडवितात, पण मनोविश्लेषण करीत नाहीत. स्व-जीवनाशी संबंधित नसणाऱ्या जीवनातील नाट्याविषयी त्या संयम बाळगतात.

२२. अेकंदर सर्व व्यक्तिचित्रणात अेक प्रकारची सहजता व अकृत्रिमता असल्याने सारी व्यक्तिचित्रे जिवंत व वास्तव वाटतात. हे ` स्मृतिचित्रे ` चे आणखी अेक अुल्लेखनीय वैशिष्ट्य होय.

.....